# नागरिकांची सनद

## प्रस्तावना

1. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील 40 लाख झोपडपट्टीवासियांना विनामुल्य 269 चौ. फुटाचे पक्की घरे देण्याचे धोरण शासनाने घोषित केले आहे. सदर झोपडपट्ट्ी पुनर्वसन योजना राअविण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास ) अधिनियम 1971 मध्ये सुधारणा केलेली आहे. सदर सुधारित अधिनियमातील कलम 3 अ (1) व (2) अन्वये राज्य शासनाने अधिसुचना क्र. झोपुयो-1095/प्र.क्र37/गृ. नि. सेल दि.16/12/1995 अन्वये बृहन्मुंबईसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे. हया अधिनियमातील कलम 3 अ (3) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन या प्राधिरणाला अधिकार व कर्तव्ये नेमुन देण्यात आली आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे स्वायत्य संस्था असुन सदर संस्थेस निगम निकाय दर्जा प्राप्त आहे. सदर प्राधिकरणाच्या कार्यालयीन कामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी / झोपुप्रा यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली 10 विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

**2. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयीन कामकाज विभागाची रचना**

| अ.क्र | मुख्य कार्यकारी अधिकारी / झोपुप्रा यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग |
|---|---|
| 1. | प्रशासन विभाग |
| 2. | वित्त विभाग |
| 3. | अभियांत्रिकी विभाग |
| 4. | नगररचना विभाग |
| 5. | उपजिल्हाधिकारी विभाग |
| 6. | विधीसल्लागार विभाग |
| 7. | नगर भूमापन विभाग |
| 8. | सहकार विभाग |
| 9. | माहीती व तंत्रज्ञान विभाग |
| 10. | समाजविकास, जनसंपर्क व प्रसिध्द्ी विभाग |

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियिम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,2005 मधील कलम 8 मधील तरतुदीनुसार झोपडपटट्री पुनर्वसन प्राधिकरणाची नागरिकांची सनद प्रसिध्द् करीत आहे. या प्राधिकरणाशी संबंधित असणा-या सेवा तत्परतेने, सौजन्यपुर्वक नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी झोपडपटट्री पुनर्वसन प्राधिकरण बांधील राहिल.

## 3. कार्यपुर्तीचे वेळापत्रक

झोपडपटट्री पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयामधील पुरविण्यात येणा-या सेवांच्या कार्यपुर्तीचे वेळापत्रक परिशिष्ट -1 येथे सादर करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनयिमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,2005 मधील प्रकरण क्र 3 च्या कलम 11 मध्ये नमुद केलेल्या न्याय प्रविष्ठ बाबी, लोकआयुक्त किंवा उपलोकआयुक्त आणि घटनात्मक संस्था, आयोग, न्यायिकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे, विधि विधानांशी संबंधित बाबी प्राधिकरणाच्या बैठकीत सादर होणा-या मुख्य धोरणात्मक बाबी इत्यादीना कार्यपुर्तीच्या वेळापत्रकातील स्तंभ क्र. 3 येथील वेळापत्रकातुन सुट राहील.

## 4.कार्यालयीन परिपत्रके

झोपडपटट्री पुनर्वसन प्राधिकरणाशी संबंधित कायदे, नियम तथा महत्वाचे शासन निर्णस इत्यादी राज्य शासनाच्या (गृहनिर्माण विभागाच्या) www.maharashtra. Gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या प्राधिकरणाच्या कार्यालयाकडुन झोपडपटट्री पुनर्वसन योजनांच्या व कार्यालयीन कामांच्या संदर्भातील वेळोवळी निर्गमित होणारी परिपत्रके www.sra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी रु. 200/- या नामामात्र किंमतीत प्राधिकरणाची मार्गदर्शिका पुस्तिका उपलब्ध आहे.

## 5. (अ) गा-हाणी, तक्रारी यांचे निराकरण

कार्यपुर्तीस होणारा विलंब व अन्य काही गा-हाणी, तक्रारी असल्यास त्या संबंधी परिच्छेद 3 मध्ये नमुद केलेल्या अधिका-यांकडे तक्रार नोदविण्यात येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासुन 7 दिवसात त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची राहील. याउपरही नागरिकाचे समाधान न झाल्यास

सचिव / झोपुप्रा अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी / झोपुप्रा यांच्याकडे नागरिकांना याबाबत तक्रार करता येईल. सदरची गा-हाणी, तक्रारी पत्राने अथवा समक्ष भेटीत मांडता येतील.

**(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परीणामकारकतेचा आढावा वेळोवेळी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

**(क) जनसामान्याकडुन सुचना**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्मानीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांर्भीयपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधरणा घडवुन आणता येतील. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी ही सनद नेहमीच सहकार्य करेल.

**6. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी दि. 15.06.2011 पासून करण्यास कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील. व त्यांच सुचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपुर्वक वागणुक देण्याची जबाबदारी प्राधिकरणातील प्रत्येक अधिकारी / कर्मचा-यांची राहील.

<u>**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांची नागरिकांची सनद**</u>

<u>**परिशिष्ट -1**</u>

<u>**कार्यपुर्तीचे वेळापत्रक**</u>

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्र .3 च्या कलम 9 (1) मधील तरतुदीनुसार विभाग / कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या हाताखालील काम करणा-या व त्याला दुय्यम असणा-या अधिका-याकडे अंमि निर्णय घेणेसाठी सोपविण्यास आलेल्या अधिकाराची यादी व सेवा कालावधी.

| अ.क्र | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयाकडुन पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक आणि कालावधी |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | झोपडपट्टीवासीयांच्या सहकारी संस्थानी नाव नोंदणी | 30 दिवस | 1. उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई पूर्व / पश्चिम उपनगरे<br>2. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मुंबई | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण<br>दुरध्वनी क्र.26591314<br>1 महीना |
| 2 | संस्थांचे पंजीकरण | 60 दिवस | 1. उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई पूर्व / पश्चिम उपनगरे<br>2. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मुंबई | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण<br>दुरध्वनी क्र.26591314<br>1 महीना |
| 3 | झोपडपट्टीवासीयांची पात्रता सक्षम प्राधिका-याकडुन प्रमाणित झाल्यावर अपात्र झोपडीधारकाकडुन प्राप्त झालेल्या अपील अर्जाची अंतीम सुनावणी झाल्यानंतर निर्णय घेणे | 60दिवस | सचिव / प्राधिकरण | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण<br>दुरध्वनी क्र.26591314<br>1 महीना |
| 4. | विकासकांची आर्थिक क्षमता तपासणे | 30 दिवस | वित्त नियंत्रक | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण<br>दुरध्वनी क्र.26591314<br>1 महीना |
| 5. | झोपडपट्टीवासीयांची वतीने विकासक व वास्तुविशारदांनी सादर केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजुर केल्यानंतर | 30 दिवस | कार्यकारी अभियंता | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण<br>दुरध्वनी क्र.26591314 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आदेश निर्गमित करणे | | | 1 महीना |
| 6. | पुनर्वसन (असल्यास आरक्षण) विक्रिच्या घटकाखालील जमिनीच्या वेगवेगळया मालामत्ता पत्रिका तयार करवुन घेण्यासाठी भूखंडाचे विभाजन / समिलीकरणाचे प्रस्ताव जिल्हा धिका-यांकडे पाठविणे | 45 दिवस | नगर भूमापन अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपटट्री पुनर्वसन प्राधिकरण दुरध्वनी क्र.26591314 1 महीना |
| 7. | योजना पुर्ण झाल्यावर सहकारी संस्थेने मागणी केल्यानंतर लाभार्थींना आळखपत्रांचे वाटप करणे. | 60 दिवस | 1. उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई पूर्व / पश्चिम उपनगरे<br>2. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मुंबई | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपटट्री पुनर्वसन प्राधिकरण दुरध्वनी क्र.26591314 1 महीना |
| 8. | भाडेपटट्री करण्यासाठी जमिन मालक प्राधिका-याकडै प्रसतव तयार करुन पाठविणे | 45 दिवस | नगा भुमापन अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपटट्री पुनर्वसन प्राधिकरण दुरध्वनी क्र.26591314 1 महीना |
| 9. | झोपडपटट्री पुनर्वसन क्षेत्रातील झोपडपटट्री पुनर्वसन योजनांमध्ये असहभागी झोपडीधारकांना संक्रमण शिबीर दिल्यानंतर झोपडी रिकामी न करणा-या झोपडीधारकांच्या बाबतीत झोपडपटट्री अधिनियम 1971 चे कलम 33 व 38 खाली निष्कासनाचे पाडून टाकण्याचे प्रस्ताव सक्षम प्राधिका-यांकडे पाठविणे | 45 दिवस | उपजिल्हाधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपटट्री पुनर्वसन प्राधिकरण दुरध्वनी क्र.26591314 1 महीना |

# झोपडपटट्ी पुनर्वसन प्राधिकरण यांची नागरिकांची सनद
## परिशिष्ट -2
## कार्यपुर्तीचे वेळापत्रक

| अ. क्र. | झोपडपटट्ी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | झोपडपटट्ी पुनर्वसन योजने अंतर्गत प्राप्त होणारे अर्ज निवेदन इत्यादीवर कार्यवाही करणे | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 मधील प्रकरण क्र. 3 च्या कलम 10 (1) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती एका दिवसात किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती 4 दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी / कार्यालयाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर 45 दिवसाच्या आत व दुस-या विभागाची / कार्यालयाची बाब अंर्तभुत असलेल्या नस्तीवर 3 महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | 1.सचिव / झोपुप्रा | मुख्य कार्यकारी अधिकारी (30 दिवस ) |
| | | | 2.वित्त नियंत्रक/ झोपुप्रा<br>3.उपजिल्हाधिकारी / झोपुप्रा<br>4.उपमुख्य अभियंता / झोपुप्रा<br>5.उपनिबंधक, सहकारी संस्था / झोपुप्रा<br>6.विधी सल्लागार / झोपुप्रा | सचिव / झोपुप्रा (30 दिवस ) |
| | | | 7.लेखाअधिकारी / झोपुप्रा | वित्त नियंत्रक (30 दिवस ) |
| | | | 8. कार्यकारी अभियता 1,2,3/ झोपुप्रा | उपमुख्य अभियंता (30 दिवस ) |
| | | | 9. तहसिलदार / झोपुप्रा | उपजिल्हाधिकारी (30 दिवस ) |
| | | | 10.सहाय्यक निबंधक (सहकार )/झोपुप्रा | सचिव (30 दिवस ) |
| | | | 11.नगररचनाकार | सहाय्य संचालक नगररचनाकार (30 दिवस ) |
| | | | 12. सर्व सहाय्यक अभियंता / झोपुप्रा | उपमुख्य अभियंता (30 दिवस ) |
| | | | 13.प्रशासकीय अधिकारी/ झोपुप्रा<br>14. नगर भुमापन अधिकारी/ झोपुप्रा<br>15. जनसंपर्क अधिकारी<br>16. माहिती व तंत्रज्ञान अधिकारी<br>17. सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | सचिव (30 दिवस ) |
| | | | 18. सहाय्यक नगररचनाकार/ झोपुप्रा | सहाय्यक संचालक नगररचनाकार 30 दिवस |
| | | | 19. नायब तहसिलदार/ झोपुप्रा | उपजिल्हाधिकारी (30 दिवस ) |
| | | | 20.सर्व दुय्यम अभियंता/ झोपुप्रा | उपमुख्य अभियंता (30 दिवस ) |
| | | | 21.सहकार अधिकारी श्रेणी -1/ झोपुप्रा | उपनिबंधक, सहकारी संस्था, (30 दिवस ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 22.सहाय्यक विधी सल्लागार/ झोपुप्रा | विधी सल्लागार (30 दिवस ) |
| | | | 23. उपसमाज विकास अधिकारी | उपजिल्हाधिकारी (30 दिवस ) |
| | | | 24. सहकार अधिकारी श्रेणी 2/ झोपुप्रा | 1.उपनिबंधक, सहकारी संस्था मुंबई पूर्व / पश्चिम उपनगरे, (30 दिवस )<br>2. सहाय्यक निबंधक, सहाकारी संस्था, मुंबई शहर (30 दिवस ) |
| | | | 25.सहाय्यक लेखा अधिकारी / झोपुप्रा | वित्त नियंत्रक (30 दिवस ) |
| | | | 26. उपलेखापाल | वित्त नियंत्रक (30 दिवस ) |
| | | | 27. मुख्य लिपीक / झोपुप्रा | उपमुख्य अभियंता (30 दिवस ) |
| | | | 28.भुमापक / झोपुप्रा | नगर भूमापन अधिकारी (30 दिवस ) |
| | | | 29.सर्व लिपीक / टंकलेखक | संबंधित शाखा प्रमुख |

**- सही -**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**झोपडपटट्ी पुनर्वसन प्राधिकरण**